# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

दिनांक :१० /०४/२०२३

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ९३ /२०२३-२४

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) मा.कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग) यांचे दि.२७/०३/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | स्पतपर्णी | ०५ ते १० फुट | ०२ | ०५ वर्ष | सदरची झाडे मिरा भाईंदर महानगरपालिका मिरारोड (पु.) शांतीनगर सेक्टर ३ येथे मलनि:सारण केंद्र कार्यान्वित आहे. सदर ठिकाणाची मलवाहिनी फार जुनी असल्याने चोकअप होऊन बंद अवस्थेत आहे. मलवाहिनी दुरुस्ती करण्याचे काम सुरु आहे या कामात ०३ नग झाडे बाधित होत असून झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | बदाम | १५ ते २० फुट | ०१ | ०७ वर्ष | |
| **२) मा.कार्यकारी अभियंता(सा.बां) यांचे दि.२४/०३/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | जंगली झाड | २० ते ३० फुट | ०२ | १० वर्ष | सदरची झाडे मिरा भाईंदर महानगरपालिका मिरारोड (पु) येथिल साई कॉम्पलेक्स सिमा सायली इमारती समोर गटार विकासीत करण्याचे काम विभागामार्फत सुरु आहे. या कामात ०३ नग झाडे बाधित होत असून झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | स्पतपर्णी | २० ते २५ फुट | ०१ | ०८ वर्ष | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबावत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(कविता बोरकर)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका